**ठळक बातम्या**

- मराठवाड्यातल्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- पशुपालन आणि दुग्धव्यवसाय विकासाकरता विदर्भ आणि मराठवाड्यात दुग्धविकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्यात येणार
- राज्यात सर्वत्र हर घर तिरंगा अभियानानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन
- राज्याचे यंदाचे सांस्कृतिक पुरस्कार जाहीर

  **आणि**

- कोलकात्यात महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्याप्रकरणाच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांचं आज काम बंद आंदोलन

**<><><><><>**

मराठवाड्यातल्या खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने आज घेतला आहे. त्यामुळे या जमिनी ताब्यात असणाऱ्यांच्या मालकीच्या होणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बेठकीत हा निर्णय घेण्यात आला. वर्ग दोन च्या जमिनी वर्ग एक करण्याची ही मागणी साठ वर्षांपासून केली जात होती. या जमिनी धार्मिक संस्थांसाठी किंवा इनाम म्हणून दिल्या गेल्या होत्या.

पशुपालन आणि दुग्धव्यवसाय विकासाला चालना देण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला. या प्रकल्पासाठी १४९ कोटी २६ लाख रुपयांचं अर्थसहाय्य मंजूर झाल्याची माहिती पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्याचा, राज्यातल्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला. राज्यातल्या शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकांना ठोक मानधन देण्याचा, नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. राज्यातल्या ६ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या डांबरीकरणा ऐवजी सिमेंट कॉंक्रिटीकरणासाठी ३७ हजार कोटी रुपये खर्चाला आज मान्यता देण्यात आली.

<><><><><>

नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यासाठी २ हजार ७६६ कोटी रुपये खर्चाच्या एकूण १ हजार ९५० कामांना आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं आज मंजुरी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. दरड - वीज कोसळणे, पूर, यापासून संरक्षणासाठी भिंत, पुलांचं बांधकाम, नाला खोलीकरण, या कामांचा यात समावेश आहे. मंत्रालयातलं राज्य आपत्ती प्रतिसाद केंद्र अद्ययावत करण्याचा निर्णयही या बैठकीत झाला. राज्यातले सर्व जिल्हाधिकारी कक्ष या केंद्राशी जोडले जातील. तसंच प्रत्येक जिल्ह्यातल्या आपत्कालीन प्रतिसाद केंद्राचं अद्ययावतीकरण करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी आज मंजूर झाला.

राज्य भूस्खलन व्यवस्थापन आराखडा, ग्रामपंचायत आपत्ती व्यवस्थापन आराखडा, महाराष्ट्र राज्य उष्णतेची लाट कृती आराखडा या आपत्ती विषयक आराखड्यांना तसंच पालघर-वसई भूमिगत विद्युत वाहिनीच्या कामाला यावेळी मंजुरी देण्यात आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

९ ऑगस्ट पासून सुरु झालेल्या हर घर तिरंगा अभियानाचा भाग म्हणून आज राज्यात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात आल्या. मुंबईत विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज महापालिका मुख्यालय ते गेट वे ऑफ इंडियापर्यंत तिरंगा यात्रा निघाली.मुंबई शहर तसंच मुंबई उपनगरचे पालकमंत्री यात सहभागी झाले.

**नागपूर** महापालिकेनं आज तिरंगा मॅरथॉनचं आयोजन केलं होतं. **छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात** वेरुळ इथं आज शालेय विद्यार्थ्यांनी शंभर फूट तिरंगा घेऊन प्रभातफेरी काढली.

**नाशिक** महापालिकेतल्या सर्व कर्मचाऱ्यांनी आज महापालिका मुख्यालयात हर घर तिरंगा अभियानाची शपथ घेतली. नाशिकमधल्या जेलरोड तसंच देवळाली इथल्या महिला बचत गटांनी तिरंग्याचा सन्मान राखण्याची शपथ घेतली आणि तिरंगा फडकवला.

**सांगली** जिल्हा प्रशासनाने तिरंगा सायकल रॅली तर सांगली शहर महापालिकेने तिरंगा मॅरेथॉन आयोजित केली होती. सायकल रॅलीत जिल्हाधिकाऱ्यांसह पोलीस अधिक्षक, महापालिका आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भाग घेतला.

**रत्नागिरी** नगर परिषदेतर्फे रत्नागिरी शहरात तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**नवी मुंबई**त तुर्भे तसंच वाशी इथं तिरंगा रॅली काढण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिक यात सहभागी झाले होते.

**वसई विरार** महापालिका क्षेत्रात तीन किलोमीटरची तिरंगा रन आयोजित केली होती.

**धुळे** शहरात भागात महापालिकेच्या अधिकारी अणि कर्मचार्यांनी नागरीकांना तिरंगी झेंडे दिले आणि हर घर तिरंगा अभियान यशस्वी करण्याचं आवाहन केलं.

**हिंगोली**त केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्याच्या नांदेड इथल्या केंद्रीय संचार ब्युरोच्या वतीने डोंगरकडा इथं हर घर तिरंगा अभियान तसंच चित्र प्रदर्शन आयोजित केलं आहे. हिंगोली शहरात आज काढलेल्या तिरंगा यात्रेत महापालिका कर्मचारी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. पालिकेने विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचं वितरणही केलं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंगा ध्वजाचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेते सुबोध भावे  म्हणाले…

**होल्ड--बाईट - सुबोध भावे**

**<><><><><>**

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत. ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना २०२४ सालचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतरत्न

पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांना जाहीर झाला आहे. नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रकाश बुद्धिसागर यांना जाहीर झाला आहे. संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार शुभदा दादरकर यांना जाहीर झाला आहे. संत साहित्यावर लेखन किंवा संतांना अभिप्रेत मानवतावादी कार्याबद्दल ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार संजय महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव हा पुरस्कार २०२३ साठी शशिकला झुंबर सुक्रे यांना तर २०२४ साठी जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे.

या पुरस्कारांशिवाय बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. सर्व पुरस्कारार्थींचे मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले आहे.

**<><><><><>**

राज्य गुजराती साहित्य अकादमीचा कवी नर्मद पुरस्कार यंदा ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड आणि ईश्वरलाल परमार यांना जाहीर झाला आहे. गुजराती साहित्य अकादमी तर्फे दरवर्षी प्रत्येकी एक मराठी आणि गुजराती साहित्यिकांना कवी नर्मद पुरस्काराने गौरवण्यात येतं. येत्या २४ ऑगस्ट रोजी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, मंगेश पाडगावकर, विजया राजाध्यक्ष, आशा बगे या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

**<><><><><>**

राज्यात विविध सार्वजनिक रुग्णालयांतल्या निवासी डॉक्टरांनी आज काम बंद आंदोलन सुरू केलं. मुंबईत मार्डच्यावतीने सकाळी साडेदहा वाजल्यापासून केईएम, नायर, सायन कुपर या रुग्णालयांमध्ये आंदोलन सुरू करण्यात आलं आहे. कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि  हत्या प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी  देशभरातल्या निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. फोर्डा या निवासी डॉक्टर संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे.

याप्रकरणी केंद्रीय तपास यंत्रणे मार्फत चौकशी व्हावी, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी असून, सुमारे साडे तीन हजार निवासी डॉक्टरांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ६९३ अंकांची घसरण झाली आणि तो ७८ हजार ९५६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २०८ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार १३९ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा असा हवामान विभागाचा अंदाज आहे.